महाराष्ट्र शासन

# शासकीय विधी महाविद्यालय

"ए" रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४१७०७ फॅक्स ०२२-२२०४१७०८

Website- www.glcmumbai.com Email id- principal@glcmumbai.com

---

क्रमांक -शाविम/वार्षिक देखभाल करार/२०१७-२०१८/173 दिनांक- १५/०१/२०१८

## दरपत्रक सूचना

**शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथील संगणक (५२),प्रिंटर (१५),व सर्व्हर यांच्या वार्षिक देखभाल करार करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत..**

मा. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्या वतीने महाविद्यालयातील संगणक (५२), प्रिंटर (१५),व सर्व्हर यांच्या वार्षिक देखभाल करार करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकांनी दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक २३/०१/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे. तरी, इच्छुक व पात्र दरपत्रकधारकांनी नमूद अंतिम दिनांकापर्यंत मोहोरबंद लिफाफ्यामध्ये दरपत्रके महाविद्यालयामध्ये सादर करावित. दरपत्रकासोबत कंपनी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, जी. एस. टी. प्रमाणपत्र इ. कागदपत्रे सादर करावीत. मोहोरबंद लिफाफ्यावर कंपनीचे नाव, पत्ता, भ्रमणध्वनी इ. नमूद करावे. दरपत्रके स्विकारण्याचा (विहित मुदतीमध्ये किंवा त्यानंतर) किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत. त्याचप्रमाणे प्राप्त दरपत्रकधारांमधून पात्र दरपत्रकधारकाची निवड संबंधित कामासाठी झाली व त्याने काही कारणास्तव कामाचे पुरवठा आदेश घेण्यास नकार दिला तर त्यापुढील कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत. तसेच दरपत्रकाधारकाशी अनुबंध झाल्यानंतर त्याने आपले काम व्यवस्थितरीत्या न केल्यास सदर दरपत्रकधारकासोबतचा करार तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल, याची नोंद घ्यावी. पात्र दरपत्रकधारकाची सदर कामासाठी नियुक्ती झाल्यावर त्याने आठवडयातून किमान एकदा सर्व संगणक (५२), प्रिंटर (१५),व सर्व्हर सुस्थितीत ठेवणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे महाविद्यालयाने सूचित केल्यानंतर संगणक, प्रिंटर, व सर्व्हर त्वरीत दुरुस्त करणे बंधनकारक असेल.

16/1/18

दिनांक-१५/०१/२०१८

GOVERNMENT LAW COLLEGE MUMBAI

श्रीमती सुवर्णा केवले,

प्राचार्या,

शासकीय विधी महाविद्यालय,मुंबई.

प्राचार्य

शासकीय विधी महाविद्यालय

'अे' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०